# साहित्य प्रेमी वार्ता

जानेवारी २०११ अंक २१ वा


**✻ संपादिका ✻**

डॉ.मंदा खांडगे

**✻ संपादक मंडळ ✻**

डॉ. ज्योत्स्ना आफळे, मीरा शिन्दे,
डॉ. रंजना फडके, शलाका माटे

**✻ पत्रव्यवहाराचा पत्ता ✻**

मीरा शिन्दे
कार्यवाह
शाकुंतल, ज्ञानेश्वर पादुका चौक,
फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे-४.
दूरध्वनी : ०२०- २५६६२६०६
भ्रमणध्वनी - ९९२२४६०५४०

येणाऱ्या वर्षाने-दीप होऊनी यावे
घरदार आणखी-अंतर ही उजळावे ।।

त्या प्रकाशातही वाट अशी चालावी
ती समाधान अन् दिव्यत्वाची व्हावी ।।

येवोत संकटे जरी वादळापरी
कर्तृत्व त्यांत की, मात करी त्यावरी

'भाषेचे हित' या भावनेस जागावे
येणाऱ्या वर्षाने दीप होऊनी यावे ।।

**- विमल लिमये**

लेखिका व साहित्यप्रेमींचे
हक्काचे व्यासपीठ

बुक-पोस्ट

**साहित्यप्रेमी भगिनी मंडळ वर्ष ४६ वे स्थापना :१९६५**

प्रति,

## मनोगत

मैत्रिणींनो नमस्कार,

सर्व साहित्यप्रेमी भगिनींना नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा! नवीन वर्ष सर्वांना सुखाचे, समृद्धीचे आणि आरोग्यदायी जावो. दरवर्षीप्रमाणे विशेष कार्यक्रमांचे 'साहित्यप्रेमी वार्तापत्र' घेऊन आम्ही आपल्या भेटीला येत आहोत.

२२ डिसें २०१० रोजी साहित्यप्रेमी भगिनी मंडळाचा वार्षिक मेळावा उत्साहात पार पडला. मेळाव्याचे अध्यक्षस्थानी प्रख्यात लेखिका डॉ.सिसिलिया कार्व्हालो होत्या. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्या म्हणाल्या, 'पारंपरिक संस्कारांची चौकट मोडून लेखन करणे, अस्तित्वाचे भान ठेवून वर्तन करणे, स्त्रीला अवघड असले तरी ते करणे आवश्यक आहे. मात्र त्यासाठी एकांगी स्त्रीवाद उपयोगाचा नाही.' या प्रसंगी त्यांच्या हस्ते मंडळाने वर्षभर घेतलेल्या स्पर्धांचे पारितोषिक, पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

एक दिवसीय मेळाव्यात गेल्या पिढीतील ज्येष्ठ लेखक कै.श्री.दा.पानवलकर यांच्या कथासाहित्याचा आढावा, जुन्या लोकप्रिय गायिकांच्या गाण्यांच्या आठवणी जागवणारा 'स्मरणस्वर' हा कार्यक्रम तसेच नाट्यचित्रपट अभिनेत्री डॉ.मानसी मागीकर यांचा 'घर' या संकल्पनेवर आधारित साहित्य, संगीत, अभिनयाने नटलेला 'अवकाशातील अवकाश' अशा कार्यक्रमांचा समावेश होता.

संशोधनात्मक लेखनकार्य, दर्जेदार दिवाळी अंक, मान्यवरांची व्याख्याने, कालीदासदिन, बाल आनंद मेळा, अभ्यास सहली, लेखनस्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, अशा विविध पातळ्यांवर संस्था कार्य करीत आहे. आपण साहित्यप्रेमींच्या ह्या अनेक उपक्रमांत सहभागी व्हावे आणि सहकार्याचा हात पुढे करावा. प्रत्येक कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित रहावे. आपला लोभ आहेच, तो वृद्धिंगत व्हावा ही अपेक्षा.

**डॉ. रंजना फडके** (कार्यवाह)

## साहित्यप्रेमी वार्ता

### अभिनंदन

*'साहित्यप्रेमीच्या' सभासदांना मिळालेले पुरस्कार आणि सन्मान*

| | |
|---|---|
| ✻ डॉ.लीला दीक्षित | - 'केसरी मराठा ट्रस्ट' तर्फे दिला जाणारा 'कै.जयंतराव टिळक स्मृती पुरस्कार' |
| ✻ कविता मेहेंदळे | - 'धुमधमाल' गोष्टी (कुमारकथा) या पुस्तकासाठी साहित्यसेवा संघ मुंबईकडून मिलिंद गाडगीळ स्मृती पुरस्कार |
| ✻ प्रा. रंजना फडके | - पुणे विद्यापिठाची 'स्त्रियांनी लिहिलेल्या चरित्रात्मक कादंबऱ्यांचा अभ्यास १९४७ ते २०००' या विषयासाठी पी.एच्.डी. मिळाली आहे. |

## स्पर्धा

✻ डॉ.शकुंतला लाटकर पुरस्कृत **'कै.आनंदीबाई लिमये'** यांचे स्मरणार्थ 'बालकथा' स्पर्धा. शब्दमर्यादा-१५०० शब्द, कथा मराठी, पूर्ण स्वतंत्र, अप्रकाशित असावी. कथेच्या दोन प्रती - **३० एप्रिल २०११** पर्यंत कविता भालेराव यांच्याकडे पाठवाव्यात. **पत्ता :** कविता भालेराव, डी.७, पूजा हाईट, गांधीभवन रोड, परांजपे शाळेजवळ, कोथरूड, पुणे-४११ ०३८. □ : ०२० - २५३९००६३

## स्वागत

साहित्यावर सुजाणपणे प्रेम करणाऱ्या लेखिकांचे व साहित्यप्रेमींचे येथे स्वागत आहे.


**✻ संस्थापक ✻**

संजीवनी मराठे, पद्मा गोळे,
शांता किर्लोस्कर

**✻ संस्थापक विश्वस्त ✻**

सरिता पदकी

**✻ कार्यकारी विश्वस्त ✻**

ज्योत्स्ना देवधर, सुमन बेहेरे,
डॉ.लीला दीक्षित,
डॉ. कल्याणी दिवेकर

**✻ अध्यक्ष ✻**

डॉ. मंदा खांडगे

**✻ कार्याध्यक्ष ✻**

डॉ. ज्योत्स्ना आफळे

### साहित्यप्रेमी कार्यकारिणी

- **कोषाध्यक्ष** - यामिनी रानडे
- **सहकोषाध्यक्ष** - कविता मेहेंदळे
- **कार्यवाह** - मीरा शिंदे, डॉ. रंजना फडके
- **सहकार्यवाह** - शलाका माटे
- **कार्यकारिणी सदस्य** - मंजरी ताम्हनकर, कविता भालेराव, संध्या गुळवणी, लीना दामले
- **निमंत्रक सदस्य** - कुमुद राळे, विजया चौधरी, डॉ. उज्ज्वला गोखले


## प्रातिनिधिक कविता संग्रह

**सस्नेह नमस्कार,**

साहित्यप्रेमी भगिनी मंडळाने स्त्री-साहित्य अभ्यासविषयक दोन प्रकल्प पूर्ण केल्यानंतर आता इतर प्रकल्प हाती घ्यायचे ठरवले आहे. हे काम सुरू करत असतानाच साहित्यप्रेमी भगिनी मंडळाच्या कवयित्रींच्या कवितांचा **'प्रातिनिधिक संग्रह'** काढण्याचे योजले आहे. त्यासाठी आपणा सर्वांचे सहकार्य हवे.

'साहित्यप्रेमी'च्या संस्थापकांपैकी कै. संजीवनीताई मराठे, कै. पद्माताई गोळे, सरिता पदकी यांच्यासह अनेक नामवंत कवयित्रींनी साहित्यप्रेमीचे दालन समृद्ध केले आहे. या सर्वांसह साहित्यप्रेमीच्या सर्व कवयित्रींच्या कवितांचा संग्रहात समावेश असेल.

**-: अटी व नियम :-**

१) आपल्या उत्कृष्ट पाच कविता (दोन प्रती प्रत्येकी) पाठवाव्या. त्यातून कविता निवडल्या जातील.
२) पाठविलेल्या कविता याआधी कुठल्याही संग्रहात समाविष्ट झालेल्या नसाव्यात.
३) कविता वृत्तपत्र, मासिकात प्रसिद्ध झाली असेल तर हरकत नाही.
४) कविता अनुवादित नसावी.
५) कविता सुवाच्य हस्ताक्षरात लिहिलेली असावी. पाठपोट लिहून पाठवू नये.
६) कविता दीर्घ नसावी. २५ ओळींपेक्षा मोठ्या असणाऱ्या कवितांचा विचार केला जाणार नाही.
७) संपादन समिती कवितांची निवड करणार असून, त्याप्रमाणे आपणास पत्राने कळविले जाईल.
८) कवितेबरोबर आपला फोटो व चार ओळींत आपला परिचय कळवावा. कविता संग्रहाची नावे कळवावीत. तसेच आपला पत्ता व दूरध्वनी क्र. कळवावा.
९) खालील पत्त्यावर कविता **दि. १५ फेब्रुवारी २०११** पर्यंत पाठवाव्या. त्यानंतरच्या कविता स्वीकारल्या जाणार नाहीत.

पत्ता : मीरा शिन्दे, कार्यवाह, साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, 'शाकुंतल' ज्ञानेश्वर पादुका चौक, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे - ४११ ००४.
दूरध्वनी : ०२०- २५६६२६०६, भ्रमणध्वनी : ९९२२४६०५४०

हे वर्ष कवीश्रेष्ठ कुसुमाग्रजांचे जन्मशताब्दी वर्ष आहे हे निमित्त साधून २८ एप्रिल २०११ रोजी या संग्रहाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. तेव्हा सहकार्य करावे.